सन 2019-2020 या वित्तीय वर्षा
अखेरीतील देयके अदा करण्याविषयी
अवलंबण्याचे कार्यवाहीबाबत-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- 411018
लेखा विभाग
जा.क्र.लेखा/06/कावि/ 33 /2020
दिनांक : 09 /03/2020

परिपत्रक,

महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या विभागांना अंदाजपत्रकामध्ये कामासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध तरतूदीच्या खर्चाचे प्रमाण खूपच कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. सन 2019-2020 हे आर्थिक वर्ष संपण्यास केवळ एक महिन्याचा कालावधी शिल्लक असल्याने विभागास उपलब्ध करुन दिलेली तरतूद खर्च करणे आवश्यक आहे.

सबब अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध करुन दिलेली तरतूद खर्च होणेचेदृष्टीने खालीलप्रमाणे आदेश देणेत येत आहे.

1) चालू आर्थिक वर्षामध्ये (सन 2019-2020) माहे मार्च 2020 अखेरची भांडवली कामांची तसेच पुरवठा व सेवा विषयक देयके ही दिनांक 27/03/2020 अखेरच लेखा विभागात स्विकारण्यात येतील. त्या दृष्टीने कोणत्याही कंत्राटदार / पुरवठाधारकांची देयके प्रलंबीत राहू नये यासाठी तात्काळ योग्य ती उपाययोजना सर्व विभागांनी करावी व विहित वेळेअगोदर देयके लेखा विभागात सादर करावीत. मुदतीनंतर प्राप्त होणारी देयके स्विकारली जाणार नाहीत व या विषयी काही तक्रार उदभवल्यास याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुखांवर राहील.

2) देयकांचा निपटारा होणेचे दृष्टीने देयकांच्या संबंधीत असणारे सर्व विभागांची कार्यालये सर्व शनिवार व सर्व रविवार चालू राहतील त्यादृष्टीने सर्व विभाग प्रमुखांनी नियोजन करुन देयके लेखा विभागास सादर करावीत.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- 411018

प्रति,

सर्व संबंधीत विभागप्रमुख / शाखाप्रमुख